# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०१०/प्र.क्र.४/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २२ ऑक्टोबर, २०१०.

प्रति,
सर्व महापालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तोतयेगीरी बाबत मतदान केंद्राध्यक्षानी करावयाची कार्यवाही.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १९ डिसेंबर, २००९ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदार आपल्या ओळखीचा पुरावा म्हणून मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त सदर आदेशात नमूद केलेल्या इतर १६ पुराव्यांपैकी कोणताही पुरावा सादर करु शकतो असे आदेश निर्गमित केले आहेत. मतदानाचे वेळी तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाकडून खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. मतदान केंद्राध्यक्षाने मतदारास आपली ओळख पटविण्याकरिता प्रथम फोटो असलेले निवडणूक ओळखपत्र सादर करण्यास सांगावे. असे ओळखपत्र सदर मतदाराकडे उपलब्ध नसल्यास किंवा त्यावरुन त्या मतदाराची ओळख पटत नसल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १९ डिसेंबर, २००९ च्या आदेशात नमूद केलेला मतदाराची ओळख पटविण्याकरिता त्याचा फोटो असलेला कोणताही पुरावा सादर करण्यास मतदान केंद्राध्यक्ष अशा मतदारास सूचना देईल.

२. एखादा मतदार फक्त शिधापत्रिका, ज्यामध्ये त्याचे किंवा त्याच्यासह त्याच्या कुटुंबियांचे नाव आहे, घेऊन कूटूंबासह मतदान करण्यास आल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याच्या ओळखीबाबत

आवश्यक ती शहानिशा करील. याबाबत शिधापत्रिकेवर मतदाराचे एकटयाचेच नाव असल्यास राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दिनांक २९ मार्च, २०१० मध्ये नमूद केलेल्या इतर पुराव्यांपैकी कोणताही पुरावा सादर करण्यास मतदान केंद्राध्यक्ष आदेश देईल.

३. उमेदवारांच्या मतदान प्रतिनिधींनी मतदाराच्या ओळखी बाबत आक्षेप घेतल्यास किंवा मतदाराने सादर केलेल्या ओळखीच्या पुराव्याबाबत कोणत्याही प्रकारची शंका असल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्या बाबत संपुर्ण शहानिशा करेल व आवश्यकता वाटल्यास इतर ओळखीच्या पुराव्यांची मागणी करुन मतदाराच्या ओळखीची संपुर्णतः खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु देईल.

जर एखादा मतदार असा ओळखी बाबतचा समाधानकारक पुरावा /कागदपत्रे सादर न करु शकल्यास त्यास मतदान करु देऊ नये. कोणत्याही परिस्थितीत तोतया मतदाराकडून मतदान होणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांची असेल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशनुसार,

आपला,

( मंगेश मोहिते )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र